जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in



६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.
☎ : (०२०) २४२१५५८३
मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

❖ संस्थापक ❖
स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया एम.ए.
संपादिका : सौ. सुनंदा एस. चोरडिया बी.कॉम.

❖ वर्ष ४८ वे ❖ अंक ७ वा ❖ मार्च २०१७ ❖ वीर संवत २५४३ ❖ विक्रम संवत २०७३

## या अंकात

| | पान नं. |
|---|---|
| ● श्री जीरावला तीर्थ - प्रतिष्ठा महोत्सव | १५ |
| ● "जिनेश्वरी" अध्याय १० - द्रुम पत्रक | १७ |
| ● जीवन के सत्य | २५ |
| ● पापों का परित्याग ही आत्म सेवा है | २७ |
| ● कडवे प्रवचन | २९ |
| ● पुणे मनपा निवडणुक | ३१ |
| ● कव्हर तपशिल | ३२ |
| ● उच्च शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती | ३३ |
| ● माता पिता की पूजा (२) | ३९ |
| ● ऐसी हुई जब गुरुकृपा - उपयोगी बण | ४९ |
| ● ८ मार्च - जागतिक महिला दिन | ५२ |
| ● आदमी मुसाफिर है... | ५३ |
| ● कुछ ऐसा करें कि | ६१ |
| ● पॉझिटिव्ह या निगेटिव्ह एनर्जी ! तुम क्या चुनोंगे ? | ७१ |
| ● विजय पताका नवचैत्राची गुढी उभारु जागृतिची | ७६ |
| ● बदलती जीवन शैली व मानसिक स्थैर्य | ७९ |
| ● हास्य जागृति | ८१ |
| ● अल्पसंख्याक मंत्रालय भारत सरकार, पढो परदेश - स्कॉलरशीप | ८३ |
| ● प्रवचन मोती | ८४ |
| ● जबकि | ८५ |
| ● बोर्ड परीक्षा भय का भूत नहीं है | ८७ |
| ● धर्मक्षेत्र में संप्रदायवाद पानी में लगी आग | ९१ |
| ● पचनी न पडणारी फॅन्सी ड्रेस स्पर्धा | ९२ |
| ● घरटे | ९३ |
| ● धर्माच्या कॉलम मध्ये जैन लिहा | ९३ |
| ● वाचकांचे मनोगत | ९९ |
| ● जैन फुलराणी, मुंबई - परिचय संमेलन | ९९ |
| ● गुरु आनंद अचल फाऊंडेशन, पुणे | १०० |
| ● एच.एन.डी. पुणे - छात्र पुरस्कार | १०१ |

- अहमदनगर मर्चन्ट बँक, पुरस्कार १०४
- युगपुरुष – महात्मा के महात्मा १०७
- पी.एम. मुनोत ट्रस्ट, अहमदनगर १०८
- एज द इमेज ब्राइटन्स – पुस्तक प्रकाशन १०९
- डेक्कन होंडा, पुणे – नवीन होंडा सिटी लोकार्पण ११०
- राज मसाले, पुणे – वर्धापन दिन १११
- मुंबई दीक्षा महोत्सव ११३
- जैन सोशल ग्रुप पुणे मिडटाऊन ११४
- कर्मो ने ही तो भाग्य बिगाडा और सँवारा ११५
- मृत्यु को महोत्सव बनाएँ – भयावह मृत्यु ११६
- श्री. विशाल चोरडिया, पुणे ११७
- सुर्यदत्ता नॅशनल अॅवार्ड २०१७ ११९
- आनंद तीर्थ, चिचोंडी – भूमिपूजन १२१
- विविध धार्मिक, सामाजिक व राजकिय बातम्या



जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर ❖ एका वर्षात तीन मोठ्या अंकासहित, एकूण अंक १२

❖ पंचवार्षिक वर्गणी –२२०० रु. ❖ त्रिवार्षिक वर्गणी – १३५० रु.

❖ या अंकाची किंमत ५० रुपये.

❖ वर्गणी व जाहिरात रोखीने / On line / RTGS / AT PAR चेक / पुणे चेकने / मनीऑर्डर / ड्राफ्टने / 'जैन जागृति' नावाने पाठवावी.

● www.jainjagruti.in ● www.facebook.com/jainjagrutimagazine

हे पत्रक संपादक, प्रकाशक, मुद्रक व मालक श्री. संजय कांतीलाल चोरडिया यांनी प्रकाश ऑफसेट, पर्वती, पुणे ९ येथे छापून ६२, ऋतुराज सोसायटी, पुणे ३७ येथे प्रसिद्ध केले. लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. जैन जागृति संबंधित कोणत्याही कायदेशीर कारवायीसाठी पुणे न्यायालय क्षेत्र ग्राह्य धरले जाईल.



# जैन जागृति मासिकाचे ग्राहक बना !

- वीतराग वाणी, आचार्य, साधू, साध्वी यांचे लेख, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक लेख, धार्मिक कथा, बोधकथा, ऐतिहासिक पुरुषांचे जीवन चरित्र, तीर्थक्षेत्र परिचय, समाज प्रबोधन लेखमाला, दीपावली पूजन विधी व मुहूर्त, आरोग्य व गृहोपयोगी लेख, विविध बातम्या इ. साहित्य जैन जागृतित प्रकाशित केले जाते.
- आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. • 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

## सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !

## जैन जागृति – वर्गणीचे दर

| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० |
|---|---|---|---|---|---|

वर्गणी व जाहिरात – रोख / मनिऑर्डर / ड्राफ्ट / AT PAR चेक / पुणे चेकने / RTGS / SBI Online / Jain Jagruti Website इत्यादी द्वारा पाठवावी.

**JAIN JAGRUTI - BANK ACCOUNT DETAILS**

**Bank : STATE BANK OF INDIA** **Branch : Market Yard, Pune 37.**

**Current A/c No. : 10521020146** **IFS Code : SBIN0006117**

## जैन जागृति मासिकात जाहिरात व वर्गणीसाठी संपर्क करा

फोन (०२०) २४२१५५८३ **मो. संजयः९८२२०८६९९७ सुनंदाः९४२३५६२९९१, www.jainjagruti.in**

**Email : jainjagruti1969@gmail.com ● Press Email : prakash.offset@rediffmail.com**

## ◆ जैन जागृतिचे प्रतिनिधी ◆

- ❖ **भोसरी, चिंचवड, निगडी –** श्री. चांदमलजी लुंकड – फोन : २७११९९४९, मो. ९९२१९११९४०९
- ❖ **पुणे शहर ❖ कुर्डुवाडी –** श्री. सुभाष मोहनलाल लुणिया, मो. ८७९३०००००८१
- ❖ **गुरूवार पेठ, पुणे –** श्री. जैन पुस्तक भंडार, फोन : २४४७२९५८
- ❖ **धनकवडी, पुणे –** श्री. सुरेंद्र हिरालालजी बोरा, मो. ७५८८९४३०१५
- ❖ **महावीर प्रतिष्ठान, पुणे –** निलम रमेशचंद्र शहा, मो. ९०९६८००५४७
- ❖ **सदाशिव पेठ, परिसर, पुणे –** सौ. स्वाती राजेंद्रजी कटारिया, मो. : ९८८१२०४३९०
- ❖ **वडगाव शेरी, पुणे –** सौ. भारती सुभाष नहार, मो. : ९८९०२७८३४६
- ❖ **वडगाव मावळ, पुणे –** श्री. राजेंद्र बाफना, मो. ९८२२२६२९०१
- ❖ **खडकी, पुणे –** श्री. विलास मुथा, मो. ९६२३१४८९८४
- ❖ **औंध, पाषाण, हिंजवडी, सांगवी, थेरगाव –** श्री. शिरिषकुमार शांतीलालजी डुंगरवाल, मो. ९०२१३००५५९
- ❖ **दापोडी, पुणे –** श्री. प्रवीण झुंबरलालजी चोरडिया, मो. ९९२२७५७७०६
- ❖ **नांदेड सिटी, पुणे –** श्री. प्रकाशजी हरकचंदजी बोथरा, मो. ९०११९८३६६६
- ❖ **दौंड, श्रीगोंदा –** श्री. रविंद्र चेनसुखलालजी गुगळे – ९८९०७२३४०२
- ❖ **घोडनदी, जि. पुणे –** श्री. पारसमलजी बांठिया, मो. : ९२२५५४२४०६
- ❖ **अहमदनगर –** श्री. महेश एम. मुनोत– मो. ९४२०६३९२३०
- ❖ **जामखेड, आष्टी व कर्जत तालुका –** श्री. प्रफुल शांतीलालजी सोलंकी – मो. ९४०३६८५६७७, ८०८७७०००७०
- ❖ **सोनई –** श्री. मदनलालजी सी. भळगट – फोन : ०२४२७-२३१४६१, मो. ९८८१४१४२१७
- ❖ **औरंगाबाद –** श्री. सुभाषचंदजी मांडोत-फोन: (०२४०) २३५३४३८ मो.: ९४२२७०५९२१
- ❖ **मुंबई खारघर–** श्री. मदनलालजी गांधी-मो. ९८२०५३६७९३
- ❖ **धनसोली, नवी मुंबई –** श्री. सुभाष केशरचंदजी गादिया, मो. ९१५८८८८६८५
- ❖ **नाशिक –** श्री. पुखराजजी बाबुलालजी जैन (कवाड) फोन:०२५३-२३११००८,मो.९४२३९३९९९०
- ❖ **नाशिक –** मनोज लखीचंदजी खिंवसरा, रविवार पेठ, नाशिक. मो. ९७६२२२१५०५
- ❖ **बीड –** श्री. अतुलकुमार शरदचंद्रजी कोटेचा, मो. ९९६००२४२२४
- ❖ **गारगोटी** (जि. कोल्हापूर) श्री. श्रीकांत राजाराम शहा, मो. ९८६०१०७७९२
- ❖ **श्रीरामपूर –**श्री. निलेश सुवालालजी हिरण, मो. : ९३२६९७२७४७
- ❖ **लासलगाव –** श्री. मनसुखजी साबद्रा, मो. : ९३२६३२५३४७
- ❖ **बारामती–** डॉ. महावीर छगनलालजी संचेती, फोन : ०२११२-२२३८०७ मो.:९३२५००४९५०
- ❖ **अंमळनेर, जि. जळगाव –** श्री. मयुरकुमार केवलचंदजी जैन, मो. ९४२२६५७१७७
- ❖ **जळगाव –** श्री. अनील कुचेरिया, मो. : ९७६३६४५०५५
- ❖ **धुळे –** श्री. चेतन सतिष कोटेचा, सुभाषनगर, धुळे, मो. ९४०४१९२४३४, ९४२०६६१४२६
- ❖ **शहादा, जि. नंदुरबार –** श्री. मनोजकुमार विरचंदजी बाफना, मो. ९४२१५२९६२६
- ❖ **इचलकरंजी, जि. कोल्हापूर –** श्री. पोपटलालजी बिसनदासजी गुगळे, मो. ९८२२६५०९९८
- ❖ **मिरज, जि. सांगली –** श्री. राजेंद्र वसंतलाल शहा, मो. ९४२११०५७४८
- ❖ **कोल्हापूर –** सौ. लता कांतीलालजी ओसवाल, मो. ९४२३२८६०१४ फोन.०२३१-२५४२२५३
- ❖ **सातारा व सातारा जिल्हा –** श्री. जयकुमार कांतीलाल शहा, वाठार, मो. – ७५८८५६१३२०, ९८५०१८२६४४

**तीर्थंकर प्रभु महावीरांचे अंतिम वचन, श्रीमद् उत्तराध्ययन सूत्रावर आधारीत**

# ।। जिनेश्वरी ।।

**प्रवचनकार : उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी म.सा.** *(क्रमशः)*

## अध्याय १० – द्रुमपत्रक

ही परम-चरम शिखर प्रभुवाणीची यात्रा --याची जशी साधना आराधना कराल प्रश्न उपस्थित होईल की भगवंतांचा हा अंतिम उपदेश आहे, या अध्यायाचा संदर्भ त्या वेळेचा आहे जेव्हा परमात्मा प्रभु महावीर गौतमाला उद्देशून बोलत होते आणि असे पाहिले तर भगवंतांनी तर कोणाएकाला उद्देशुन कहीही सांगितले नाही ! त्याचे समाधान आहे की मूळ सिध्दान्त, मूळ सूत्र, अंतिम उपदेश परमात्म्याचा आहे त्या अंतिम उपदेशाला सुधर्मास्वामींनी संकलित केले, शब्दबध्द केले. संपादित केले. **भावं अत्थं भासं अरहा, सुत्तं गुफंती गणधरा अर्थात अर्थाचा प्रकाश तीर्थंकर देतात आणि त्याला शब्दाचे शरीर गणधर देतात.** अन्नधान्य शेतकरी देतो पण भाकरी आई देते, कापूस शेतात येतो व कापडे गिरणीत तयार होतात. गणधर ही आई आहे, गिरणी आहे. तीर्थंकर हा निसर्ग आहे. निसर्गाने दिलेले दान हे तीर्थंकरांचे दान असते. ज्या स्वरूपात आपण खाऊ शकतो, ग्रहण करू शकतो त्याच रूपात ते आपल्या कामास येते. ज्या रूपात आपण पचवू शकतो त्या रूपात आपल्यापर्यंत पोहचविणारे गणधर आहेत.

**काळाचा अपराध अक्षम्य**

जीवनात सर्वात मोठे कोणते पाप, अकृत्य असेल तर ते आहे प्रमाद, **या प्रमादातूनच सर्व पापांचा, सर्व दुःखाचा जन्म होतो.** या प्रमादाची दोन स्वरूपे आहेत. कषाय आणि शिथिलता. प्रमादा मुळेच आपण अहंकार करण्यास प्रवृत्त होतो व प्रमादा मुळेच आपल्या संयमात, मर्यादा पालन करण्यात शैथिल्य, आळस येतो. प्रमादाचे स्वरूप मात्र खूप लोभस वाटते. सुखावह वाटते. प्रमाद येण्याची कारणे पुष्कळ आहेत आणि कधी-कधी विनाकारण ही प्रमाद येतो.

मजूर खूप लांबून ओझ वाहत असतो. पोचण्याचे स्थळ अगदी समोर दिसत असतानाच तिथंपर्यंत पोहचण्याचे दोन मार्गही दिसतात.एक थोडा फिरून जाणारा मार्गही दिसतो व एक आडमार्गही दिसतो. तो राजमार्ग सोडून आडरस्त्याने जाऊ लागतो. पण हा मार्ग विषममार्ग असतो. चढ-उताराचा असतो. असा चढउतारा वरून वाटचाल करून तो थकून जातो. ओझे उतरवून तो झोपून जातो. असेच प्रमादाचे सूत्र आहे. ध्येय गाठणे अगदी जवळ असते व एका क्षणाची डुलकी आणि ध्येय हुकलं जातं, सगळी यात्रा व्यर्थ होते. एका क्षणाचा प्रमाद वर्षानुवर्षेच्या तपस्येवर पाणी फिरवतो.

या अंतिमवाणीत भगवंतांनी अप्रमादाचा उपदेश केला आहे. या अंतिम वाणीत अनंत सामर्थ्याचे दान भगवंतानी केले आहे. वेळेच्या बाबतीत प्रमाद करायचा नाही. वेळेचा प्रमाद हा अक्षम्य अपराध आहे. बाकी सर्व अपराधांना प्रायश्चित आहे, इतर सर्व गुन्हे परिमार्जन करण्याची विधी आहे. इतर सर्व चुकांना सुधारण्याची संधी आहे. परंतु वेळेच्या बाबतीत केलेला अपराध अक्षम्य अपराध आहे.

**लवसत्तमा**

अनुपम उर्ध्वलोकी स्थित देवतांचे आयुष्य ३३ सागरोपम असते. ज्याला आपण अल्प समयाचा मुक्तिचा

आनंद म्हणू शकतो. त्या देवतांसाठी शास्त्रात एक छोटासा शब्द प्रयोग केला आहे. लवसत्तमा-सात लव-अतिशय कमी वेळ. साधना सुरू करायला थोडासा उशीर केला त्याचे परिणाम त्यांना ३३ सागरोपमचे आयुष्य देव लोकात कंठावे लागेल. तेथील आयुष्य पूर्ण करून पुन्हा गर्भवासातील वेदना सहन करावी लागेल...कमीत कमी ८ वर्षे असेच जगावे लागेल नंतर संन्यास घेऊन पुरूषार्थ, पुन्हा आत्मिक पराक्रम करूनच मुक्तिचा आनंद घेऊ शकतात. एवढी यात्रा का लांबली ? बाकी काही नाही. श्रध्देत कमी नाही ध्यानात उणीव नाही, चरित्रात चूक नाही, पराक्रमात दोष नाही कमतरता एवढीच की साधना फक्त सप्तलव एव्हढी उशीरा सुरू केली. जर ती लवकर सुरू केली असती तर ते सिद्धीस प्राप्त झाले असते.

म्हणून भगवंत कळकळीने वारंवार जागृत करीत आहेत सर्व चुका अश्रुंनी धुवुन काढू शकता, क्षमा मिळू शकते, प्रायश्चित करता येते पण काळाचा - वेळेचा दुरूपयोग - प्रमाद अक्षम्य अपराध आहे. आपल्या जीवनाकडे पहा कदाचित मला वाटते आपण जितका वेळेचा अपराध करतो बाकी कोणताही अपराध करीत नाही. काळाचा अपराध अक्षम्य आहे भगवंत सांगतात- कालस्स आसायणाए **काळाचा अनादर करू नका, ज्याने काळाला गमावले त्याने काहीच नाही कमावले. ज्याने वेळ साधली त्याने जीवनात सर्व काही साधले.**

**वेळेची महती - ज्वारी बनले मोती**

ज्याने वेळ साधली त्याला सर्व साध्य झाले. याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. एक ब्राम्हण होता खूप ज्ञानी होता. तो सतत ज्ञान साधनेत मग्न असे. त्यामुळे त्याची पत्नी वैतागली होती. ह्या पोथ्या तुम्ही वाचता त्याने काय भाकरी मिळणार आहे का ? एके दिवशी ती खूप त्रासली तिने त्याला सांगितले ''हे तुमचे शास्त्र चुलीत घाला, उद्या काय खायचं ? घरात अन्नाचा एक कण नाही आणि तुम्ही या पोथ्या वाचत बसला आहात !''

ब्राम्हण समजवणीच्या सुरात म्हणाला ''अगं ! भाकरीसाठी या शास्त्रांची निंदा का करतेस ? ती म्हणाली'' काही कमवून आणा मग तुम्हाला कळेल. तो म्हणाला, ''अगं, या शास्त्रात काय आहे हे तुला माहीत नाही म्हणून तू याला मानत नाही पण त्याचा अवमान तरी करू नकोस.''

त्यावर ती म्हणाली ''काय आहे तुमच्या शास्त्रात? मला पहायचेच आहे'' ''ठीक आहे. मी उद्या पासुन साधना सुरू करतो. माझी साधना पूर्ण होईल तेव्हा मी तुला हाक मारेल, तू तयार रहा, अगोदरच तयार रहा - चूल पेटव - चूलीवर एका पातेल्यात पाणी उकळायला ठेव, पाण्यात उकळी फुटु दे मी संकेत केल्यावर तू त्या पाण्यात ज्वारी टाक.'' ती म्हणाली ''का बरं ? त्याने काय होईल ?'' बंधूंनो, जीवनाचे मोठे सूत्र आहे. गुरू ईश्वर, आप्तजन काही आज्ञा, आशीर्वाद देतात आणि त्यावेळेस तुमच्या मनात आले किंवा विचारले की 'काय होईल त्याने' तर हा 'का' आणि 'काय' सिध्दी मार्गात अडथळा निर्माण करतो.

एका क्षणात सर्व खीर नासून जाते. पर्वत डोळ्याआड करायला दुसऱ्या पर्वताची आवश्यकता नाही. डोळ्यात गेलेला एक कण ही पर्वताला डोळ्याआड करतो. हा 'का' शब्द सर्व सिध्दि, सफलता, संपूर्णतेला जीवनाआड करून देतो. ब्राम्हणाने सांगितले कि ''तू त्यावेळेस ज्वारी टाकली तर त्या दाण्यांचे मोती होतील.'' ब्राम्हण तिला समजावून सांगतो पण तिचा विश्वास बसत नाही ती सांगते. ''खरं का ? बघू प्रयोग करून'' घरात ज्वारी नाही शेजारून आणते.एक महत्वपूर्ण गोष्ट लक्षात ठेवा जगात सर्व जण तुमच्यावर विश्वास ठेवू शकतात. पण पत्नी जर तुमच्या बुध्दीमत्तेवर विश्वास ठेवत असेल तर तुम्ही स्वत:ला भाग्यवान समजा.

**स्वकीयांचा अविश्वास व परक्यांची श्रध्दा**

ती शेजारच्या घरी गेली. नेहमीचीच सवय होती कधी गूळ मागत असे. कधी कणीक मागत असे, कधी

मीठ मागत असे. त्या दिवशी ज्वारी मागायला गेली तिने विचारले ''आज ज्वारी कशासाठी?'' ब्राम्हणीने शेजारणीला सांगितले ''अगं, त्यांचे डोके फिरले आहे.'' ''का गं असे म्हणते?'' ''ते म्हणतात उद्या ती कोणती तरी साधना ते करणार आहेत ? साधना झाली की उकळत्या पाण्यात त्यांच्या हाकेनंतर ज्वारी टाकली की त्याचे मोती होतील म्हणे.'' त्या शेजारणीची ब्राम्हणावर श्रध्दा होती. असेच होत असते जगात परके लोक श्रध्दा ठेवतात. आत्मीय जन विश्वास ठेवतात. आणि स्वकियांचा अविश्वास काट्याप्रमाणे बोचतो. त्या शेजारणीने सांगितले ''घेऊन जा, तुझ्या घरात पुष्कळ मोती तयार होतील, तुझा महाल तयार होईल, मला त्याची सावली मिळेल,'' ती ज्वारी घेऊन गेली. शेजारीण विचार करत होती आपली आणि त्यांची एकच भिंत आहे, ब्राम्हण साधना करेल त्या साधनेचे मंत्र फक्त त्या घरापुरतेच मर्यादित राहणार नाही. त्यांचे उच्चारण मलाही ऐकू येतील. शेजारणीने भिंतीला अगदी लागूनच चूल पेटविली. पाणी उकळत ठेवले.

तिकडे ब्राम्हणीच्या मनात श्रध्दा तर नव्हतीच पण कुतुहल फार होते. म्हणून फक्त वाट बघत बसली ब्राम्हण केव्हा संकेत करतो. परंतु कंटाळून तिला डुलकी लागली. ब्राम्हण साधनेत दंग होता. जशी मंत्र साधना पूर्ण झाली त्याने संकेत केला. हाक ऐकून ती दचकली रागाने म्हणाली, जरा हळू बोला ना.... टाकू का'' ''तो म्हणाला मी तुला लगेच टाकयला सांगितले होते तू मध्ये का बोलली ?'' ती तावातावाने बोलली ''त्यात एवढं चिडायला काय झालं ? हे पहा लगेच टाकते आणि बघते काय होतं की नाही ? '' ज्वारी टाकली आणि चिडतच बोलली ''कुठे आहेत मोती ? मी तर अगोदरच सांगत होते कि ज्वारी कधी मोती बनू शकतात का ? घुगऱ्या होऊ शकतात पण मोती कदापि नाही'' ती ब्राम्हणी ब्राम्हणाला फटकारतच होती हे शेजारणीला सहन झालं नाही, ऐकवलं गेलं नाही. ती मनात पुटपुटली चूक स्वत:ची आणि फटकारते त्या देव माणसाला. कारण तिने विधी सांगितल्याप्रमाणे बरोबर केली होती तर तीची ज्वारी मोती बनले होते. ती ते मोती घेऊन त्यांच्या अंगणात आली. ब्राम्हणाला वाकून नमस्कार केला. मोत्यांचे अर्ध्य ब्राम्हणाच्या चरणावर अर्पण केले. त्याला आश्चर्य वाटले. शेजारणीने सर्व माहिती सांगितली. ऐकून ब्राम्हणाला आनंद झाला की माझी साधना सिध्द झाली. ब्राम्हण आपल्या पत्नीकडे बघतच राहिला. ती म्हणाली मी पुन्हा अशी चूक करणार नाही. तुमच्यावर श्रध्दा ठेवीन आणि वेळ पण साधेल. पुन्हा एकदा साधना करावी. ब्राम्हण म्हणाला ''आता पुन्हा होणे अशक्य आहे.'' म्हणूनच भगवंत म्हणतात इतर सर्व अपराध चालतील पण वेळेचा अपराध काळाचा अनादर करण्याची चूक करू नका.

**सर्वात मोठा अपराध निष्काळजीपणा**

असावधानता ही जीवनात सर्वात मोठी चूक आहे. प्रमादामुळे क्रोधाचा जन्म होतो. अहंकाराला पोषण मिळते. प्रमादामुळे रोगाची उत्पत्ती, आळस निर्माण होतो. प्रमाद दोन्ही किनाऱ्यांना स्पर्श करतो. प्रमादाचा अर्थ शिथिलता नैराश्य-नाही. प्रमादाचा अर्थ आहे की जे ध्येय नजरेसमोर ठेवून तुम्ही वाटचाल करीत आहात त्या लक्ष्याबद्दल निष्काळजीपणा निर्माण होणे, आराध्यव्यक्ति आणि साधनेबद्दल उपेक्षाभाव मनात जन्मणे, आराध्याच्या आनंदानुभूतीला वंचित होणे.

आपणही खूप जप-तप धर्म आराधना करतो तरी देखील संकटे आली तर आपल्या मनातही खिन्नता येते. परंतु भगवंत गौतमाद्वारे आपल्या सर्वांनाच प्रतिबोधित करीत आहे. ''हे पंथस्था, हे महान आत्म्यांनो, चूकूनही प्रमाद करू नका. आपण इथपर्यंत अगदी काटेरी रस्ता पार करून, अत्यंत परीश्रम करून पोहचला आहात. आठवा आपली यात्रा पृथ्वीकायच्या त्या यात्रेला .. गत जन्मींच्या जन्मजन्मांतराच्या यात्रेचे स्मरण करा. असंख्यात काळापर्यंत मातीतले जीवन जगलात.

असंख्यात काळ पाण्याचे जीवन कंठित केले. असंख्यात काळ अग्नीत जगलात, हवा बनून जगलात, वनस्पतीत तर अनंत काळ जन्म-मरण झाले. त्यानंतर बेइन्द्रिय, तेइन्द्रिय व चतुरेन्द्रिय शरीरात असंख्यात वर्ष वास केला. असन्नी पंचेन्द्रिय अवस्थेतही खूप काळ गेला आणि एवढी दीर्घयात्रा केल्यानंतर तुम्हाला मनुष्य जन्म मिळाला आहे आणि असं ही नाही की, मनुष्य जन्म प्रथमत:च प्राप्त झाला आहे. याच्या आधीही मनुष्य जन्माची यात्रा झालेली आहे. कधी आंधळे, लुळे, पांगळे, मूक बधीर म्हणूनही जन्माला आला असाल परंतु भाविकांनो, आपल्या परमसौभाग्यामुळे पंचन्द्रियांनी परीपूर्ण हा नरदेह मिळाला. आता प्रमाद करू नका, आता मागे वळून बघू नका.

जशी पानगळाच्या ऋतुत झाडांची पिवळी झालेली पर्ण टिकत नाही, तृणाच्या-गवताच्या टोकावर असलेला दवबिंदू अल्पवेळ टिकतो तसेच मनुष्य जीवन ही क्षीण होत जाते. द्रुमपत्राप्रमाणे क्षणिक असणारे हे आयुष्य कधी मातीत मिळेल हे सांगता येत नाही. म्हणून पंथका प्रमाद करू नकोस.

ज्यावेळी इंद्रभूती गौतमाच्या मनात आराध्या बरोबरच जगण्याच्या सार्थकतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले, त्यावेळी हा अध्याय गायला गेला. त्याबाबत २ प्रसंग आहे. प्रमादाला समजण्यासाठी, प्रमादाचे चरित्र लक्ष्यात येण्यासाठी, प्रमादाचे दुर्दैव ऐकण्यासाठी, प्रमादाचा नरकवास समजून घेण्यासाठी इंद्रभूती गौतमाच्या जीवनातील प्रसंग आहेत.

पृष्ठचंपा येथे परमात्मा महावीर आले. तेथील शाल राजाने दीक्षा घेतली. दीक्षा घेण्यापूर्वी भगवंताला सांगितले की ''देवा माझ्या मुलाचा राज्यभिषेक करून मग दीक्षा घेतो.'' त्याने त्याच्या मुलाला बोलावले व सांगितले, ''मला संन्यास घ्यायचा आहे, आता या विशाल राज्याची धुरा तू सांभाळ.'' मुलगा अतिशय बुध्दिमान होता. त्याने वडिलांना विचारले ''हे विशाल साम्राज्य त्याग करून तुम्ही आणखी काय प्राप्त करायला जाणार आहात ?'' तो म्हणाला ''मी शाश्वत राज्य मिळवायला जाणार आहे.'' मुलगा म्हणाला, ''तुम्ही माझे वडील आहात तर मला शाश्वत राज्यापासून वंचित करून ह्या नश्वर राज्यात का अडकवित आहात? जर तुम्ही माझे पिता आहात तर जे प्राप्त करण्यासाठी तुम्ही हे सोडत आहात, ज्या वैभवामुळे तुम्हाला निस्तेज वाटत आहे. तर मला हा कचरा का देत आहात ? मलाही घेऊन चला ना त्या वैभवाच्या शिखरावर ?'' महाशाल सुध्दा संन्यास घ्यायला तयार झाला. नंतर शाल राजाने त्याचा भाचा गागली यास बोलावले. गागलीचा राज्यभिषेक करून मग स्वत: संन्यास घेतला

**अंतरंगातील आत्मभावामुळे भगवत् सिध्दी**

संन्यास घेऊन निघाला. परमात्मा राजगृही नगरीत आले. तेथे आल्यावर शाल राजाच्या मनात एक गोष्ट खटकू लागली की आपण सिध्दिच्या पथावर पाऊल टाकले आणि भाच्याला संसाराच्या पथावर सोडून दिले. आपण वैभवाचा मार्ग निवडावा आणि भाच्याला दुर्भाग्याच्या मार्गावर भटकण्यासाठी सोडून आलो. आता आपल कर्तव्य आहे की त्याला दुर्भाग्याच्या रस्त्यावरून मुक्त केलं पाहिजे आणि परमसिध्दीच्या मार्गावर आणलं पाहिजे.

शाल मुनि भगवंताकडे गेले आणि विनंती केली की ''भगवंता ! आपली आज्ञा असावी, आपले आशीर्वाद असावे आपली इच्छा, परवानगी असेल तर आम्ही पृष्ठचंपा येथे जाऊ इच्छितो. त्यांना जागृत करायचे आहे. आम्ही त्यांना संसारात अडकविले. त्यांना त्या चक्रातून बाहेर काढू इच्छितो.'' भगवंतांनी त्यांना आज्ञा व आशीर्वाद दिले. शाल, महाशाल आणि इंद्रभुती गौतम पृष्ठचंपा येथे आले. गागलिला प्रतिबोध दिला. जागृत केले त्यानेही संन्यास घेतला. सर्वजण भगवंताच्या दर्शनासाठी राजगृहीकडे येत होते. परतताना गागलीच्या मनात आत्मभाव, आत्मप्रिती निर्माण झाली.

आश्चर्यकारक, अनुपम आस्था, प्रीति निर्माण झाल्यामुळे त्या भावलहरी मनात ऊठु लागल्या. 'माझे मामा किती थोर आहेत !' त्यांनी प्रथमत: मला स्वत:चे राज्य दिले, आता परमात्म्याच्या राज्यातही घेऊन जात आहे. माझ्यावर त्यांचे किती उपकार आहेत. अंतरंगात जेंव्हा आत्मभाव निर्माण होतो, तेव्हा भगवंताचा जन्म होतो आणि जेव्हा आत्मभावाऐवजी अहंकार भावाचा जन्म होतो राक्षसाचा, रावणाचा जन्म होतो.

गागली आत्मप्रीतीत चालत होता. इंद्रभुती गौतम, शाल, महाशाल सर्वच चालत होते आणि चालता चालता गागलीला आत्मसाक्षात्कार झाला, आत्मभावामध्ये तो प्रभु बनला.

**आराधनेचे एकमेव सूत्र-परम आत्मभाव**

म्हणूनच मी तुम्हाला आग्रह करीत आहे. प्रेरणा देत आहे की असाच आत्मभाव - आत्मप्रीति आपल्यात निर्माण होऊ द्या, काय गायन करीत आहात ? कसे शुध्द-अशुध्द बोलत आहात हे महत्वपूर्ण नाही पण महत्वपूर्ण आहे आपल्या अंतरंगातील आत्मभाव. तो जन्मावा, जगावा म्हणूनच तर हि पारायणाची साधना-आराधना आहे भगवंताची आपल्यावर किती कृपा आहे की या कलीयुगात, पंचम काळात आपल्याला समृध्द करण्यासाठी हा मंगल उपदेश केला. आता महत्वपूर्ण आहे आपल्या अंतरंगात तो परम आत्मभाव अक्षरांची आराधना करताना जागृत होणे.

हनुमानाकडे तो परम आत्मभाव होता. रामाच्या सहवासात राहून सुध्दा सीता हनुमानाच्या आत्मभावाला समजू शकली नाही. सीतेने हनुमानाला बक्षीस म्हणून मोत्याचा हार दिला. रामाने त्याला काहीही दिले नव्हते. रामाला पक्के ठावूक होते की हनुमानाला माझ्याशिवाय काही नकोय. माझ्याशिवाय त्याला काहीही दिले तर तो ते फेकून देईल. सीतेने हार दिला. हनुमान आत्मभावाने म्हणाला ''हे मला काय दिले ? यात राम आहे का?'' त्याने प्रत्येक मणी तोडून पाहिला. राम दिसतो का ? नाही दिसला राम - फेकून दिला मणि, अशा दिव्य भावनेला परम आत्मभाव म्हणतात.

अशाच आत्मभावात गागलीही चालत होता. भगवंताचे दर्शन करण्यासाठी चालत होता. अत्युच्च आत्मभावामुळे त्याला परम ज्ञानाची प्राप्ती झाली. कोणतेही विशिष्ट ध्यान नाही, देहत्याग नाही, स्वाध्याय नाही, तपस्या नाही केवळ परम आत्मभाव... आत्मप्रीति आणि त्याचा परिणाम आत्मसाक्षात्कार चालता चालताच तो परमात्मा बनला, त्याला केवलज्ञान प्राप्त झाले. मला असे वाटते अशी आत्मप्रीति आपल्यातही जागृत व्हावी आणि ही दिव्यवाणी ऐकता ऐकता आपणही परमात्मा होवून जावे. या जीवनात आणखी कोणत्या गोष्टीची अपेक्षा आहे ? कशाची प्रतीक्षा आहे ? एवढीच की याची देही याची डोळा अनंत आनंद मिळावा. असा आनंद की ज्या आनंदाच्या अनुपस्थित मुळे संपूर्ण संसार दु:खी-कष्टी आहे आणि आपणही संसारासाठी दु:खमय झालो आहोत.

भगवंतांच्या धर्मसभेत पोहचताच इंद्रभुती गौतमाने भगवंतांना वंदन केले, भगवंताची प्रार्थना करायला सुरुवात केली. त्याच्या बरोबर आलेले शाल, महाशाल आणि गागली परमपिता भगवंतांना वंदन न करता केवली परिषदेच जाऊ लागले. सरळ भगवत्तेच्या परिषदेत जाऊ लागले. इंद्रभूती त्यांना थांबवू लागले. भ. महावीर म्हणाले, ''इंद्रभूती, ते आता पूर्णत्वाला प्राप्त झाले. परमेश्वर झाले. त्यांना भगवत्तेच्या परिषदेला जाऊ दे. त्यांना अडवू नकोस.''

**मला प्रभु हवे, प्रभुता नको**

गौतमांनी ऐकले त्यांना खंत वाटली. हे परमात्म्याजवळ येता-येताच परमात्मा झाले आणि मी त्यांच्या समवेत राहून ही परमात्मा झालो नाही. त्यांच्या मनात उद्वेग निर्माण झाला. खंत वाटून खिन्नता मनात दाटली. एक क्षणभर आपल्या सर्व साधनेवर, भक्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले की माझी भक्ती व्यर्थ आहे,

माझे समर्पण व्यर्थ आहे, माझे प्रभूशी मीलन व्यर्थ आहे माझे जगणे व्यर्थ आहे. एक क्षणभर अशी खिन्नता – नैराश्याने ग्रासले.

पण तत्क्षणी भगवंतानी गौतमाला सावरले... ''नाही ! इंद्रभूती ! असा विचार करू नकोस. तुझी भक्ती व्यर्थ गेली नाही. तू कोठेही कमी पडत नाहीस, केवळ एक कारण आहे की तुझे आणि माझे जन्मजन्मांतराचे नाते आहे. तू माझी भक्ती करतोस, तू स्वत:ची भक्ती करीत नाहीस. तू मला भगवंत स्विकारतो परंतु स्वत:मध्ये विराजमान भगवत् सत्तेला जाणत नाहीस. तुला स्वत:ला प्रभुपदावर विराजमान व्हायचे असेल तर मला परमात्मा स्वीकारणे बंद कर. तू त्वरीत परमात्मा बनून जाशील.''

इंद्रभूतीने एका क्षणात हा प्रस्ताव नाकारला. ते म्हणाले ''नाही प्रभू ! हे संभव नाही, हे संभवच नाही की आपण स्वत: विराजमान असतांना मी स्वत:ला परमात्मा मानू. हे मला कदापि शक्य नाही. मी संपूर्णज्ञानी झालो नाही तरी चालेल परंतु प्रभू..प्रभू आपणच मला हवे आहात. मला परमात्मा व्हायचे नाही. जर दिव्यज्ञानासाठी परमात्मा बनण्याची अट असेल तर मला ते दिव्य ज्ञानही नको आणि ते देवत्त्वही नको.मी आपला भक्तच पुरेसा आहे.''

**श्रध्देच्या संबंधाला मृत्यू नसतो.**

एक अनुपम भक्ती, एक विलक्षण भक्ती ज्या भक्तीसमोर सर्व सुख पाणी भरतात. अशा दिव्य भक्तीत गौतम जगले म्हणून आजही त्यांचे नामस्मरण केले जाते. शासन भगवंतांचे आणि अधिकार इंद्रभूती गौतमाचे म्हणून त्यांना लब्धि शक्तीचे भंडार म्हटले जाते. भगवंतांनी इंद्रभूती गौतमाला सांगितले, ''इंद्रभूती, प्रमाद करू नकोस, प्रमादामुळे ज्यांचा लाभ झाला आहे ते गमावून बसशील, जे प्राप्त झाले आहे ते नाहिसे होईल. आपला संबंध, आपले नाते आता संपणार नाही. आपल्या संयोगात वियोग होणार नाही. ज्यावेळी मला मुक्ती प्राप्त होईल तेव्हा तूही देवत्व प्राप्त करशील. म्हणून तू चिंता करू नकोस, उद्विग्न-खिन्न होऊ नकोस. आपले संबंध शाश्वत आहे, अमर आहे. राग-द्वेषातून जे संबंध निर्माण होतात, त्यांचा मृत्यू होतो. श्रध्देतून निर्माण झालेले संबंध कधीही संपत नाही. रागातून निर्माण झालेल्या संबंधाचे तिरस्कारातून निर्माण झालेल्या नात्याचे रूपांतरण होते. त्याचाही मृत्यु होतोच.

दुसऱ्या एका प्रसंगात इंद्रभूती गौतम जेव्हा स्वत:द्वारा प्रतिबोध प्राप्त झालेल्यांना केवलज्ञान, सर्वदर्शी होताना पाहतात. तेव्हा स्वत:च्या छद्मस्थपणाबद्दल, सामान्यत्वाबद्दल खिन्नता मनात दाटते. ही खिन्नता, खंत सुध्दा प्रमाद आहे. अशीही खिन्नता ध्येय मार्गावरून भटकवून टाकते.

या अध्यायात भगवंत ३६ वेळा आवर्जुन सांगत आहे की वेळेचा, काळाचा प्रमाद करू नका. बाकी सर्व पापांना प्रायश्चित आहे, क्षमा आहे. दोष धूवुन काढण्यास प्रक्षालन आलोचन आहे, कुणाला अपशब्द बोलला तर क्षमेची व्यवस्था आहे. मिच्छामि दुक्कडमची परंपरा आहे परंतु वेळेचा अपराध करणाऱ्याला क्षमा नाही, प्रायश्चित नाही, माफी नाही.

**प्रभु महावीरांचा गौतमाला दिव्य उद्बोध :-**

प्रभु महावीर इंद्रभूती गौतमांना सांगत आहेत ''गौतम तू काळाचा अपराध करू नको ध्येय प्राप्तीसाठी तू इथवर पोहोचलास, काट्यांचा मार्ग पार पाडलास फुलांचा मार्ग समोर आहे त्यात फसण्याची चूक तू करू नकोस, त्यात भाळला गेला. तर पुन्हा काट्यांनी रक्तबंबाळ होशील धर्मश्रवण करण्याचं भाग्य लाभलं, धर्मसुध्दा तुझ्याठायची आहेच ही संधी दवडू नकोस. आयुष्य तर भराभरा पळत आहे, सरासर सरकत आहे, वेळ हातातून निसटून जात आहे. इंद्रियांची शक्ति दिवसे न दिवस क्षीण होत चालली, केस पिकायला लागले आहेत पर तु आत्मशक्ति कमी होऊ देऊ नको ज्या

गोष्टींचा एकदा त्याग केला पुन्हा वळून त्याच्याकडे पाहू नको. तुला धर्माची प्राप्ती झाली आहे. आता अधर्माकडे पाय वळवू नको. जीवनात पुढे-पुढे जात रहा. आजीवन प्रतिज्ञाबध्द हो गौतम!''

बंधूंनों, भगवंत केवळ गौतमांनाच नाही आपल्या सर्वांना अंतिम उपदेश शेवटची शिदोरी आपल्या बरोबर देत आहेत. ''गौतमा ! तू एकत्वाची आराधना करीत इथवर पोहचलास, एवढा भला मोठा सागर पार करून किनारा गाठलास. आता फसगत, प्रमाद करू नकोस शीघ्र पार पोहचण्यासाठी पराक्रम कर.''

बंधूंनो ! या पृथ्वीतलावर किती तरी असे दुर्भागी-कमनशिबी लोक आहेत जे नरदेह मिळूनही भगवंतांच्या वाणीचा एक शब्द ही ऐकत नाहीत. परम सौभाग्य तुमचं न आमचं हे की कुळात जन्म झाला जिथे मुळातच संस्कार दिले जातात. श्रोत्यांनो ! तुम्ही या दिव्यवाणीचे पारायण करण्यासाठी इथपर्यंत आलात अभिनंदन तुमचं, तुम्ही या भगवत् वाणीच श्रवण करीत आहात. श्रध्दा ठेवत आहात. फक्त श्रध्दा असूनही पूर्णता येत नाही. त्या श्रध्देसाठी मोल चूकवावं लागतं. त्यासाठी पुरूषार्थ पराक्रम केला तर श्रध्दा सार्थ होते. ही जिनेश्वरी तुमच्या बोलण्यात, चालण्यात, जगण्यात जिवंत रहावी... प्रत्येक क्षणात उतरावी ही मंगल अतीमंगल भावना.

''जीवनात कुठेही असलास तरी... संति मग्गं च बुहए - शांतीचा मार्ग प्रशस्त करीत जा. स्वत:च्या चालण्यातून, बोलण्यातून, वागण्यातून बघण्यातून आपल्या विचारांतून अशांती निर्माण होईल. असे काहीच करू नका. तुझ्या आचरणातून शांतीचे अमृत पाझरू दे. तुझ्या बोलण्यातून मधुर स्वर वातावरण ओघळू दे. तुझ्या जीवनाचा आनंद सुगंधाप्रमाणे जगामध्ये दरवळू दे.''

इंद्रभूती गौतमांनी भगवंताचे शब्द केवळ ऐकले नाहीत तसे ते जगले-वागले त्याच भक्तिने आपण ही ऐकूया.. गाऊया..जगूया. *(क्रमश:)* ●

## जीवन के सत्य

**आचार्य श्री विजयरत्नसुन्दरसूरिजी म.सा.**

भोगी वह है
जिसे संसार से निकलना पड़ता है ।
जबकि योगी वह है
जो संसार से निकल जाता है ।
फर्क समझ में नहीं आया ना ?
**एक को संसार ''डिसमिस''**
**कर देता है ।**
**जबकि दूसरा संसार से**
**'त्यागपत्र' दे देता है ।**
**किसमें नंबर लगाना है ?**
**सोच लेना ।**
जेब से दस रूपये की नोट गिर गई
यह खयाल आते ही मानव का चेहरा
उतर जाता है, लेकिन
नाशवंत पदार्थ बढ़ाने के पीछे,
भ्रामक ख्याति की प्राप्ति के पीछे
जीवन के अति महत्वपूर्ण कहे जा सकें
ऐसे पचास वर्ष बीत गये हैं
ऐसे प्रतीति होने के बाद भी
मानव के चेहरे पर कोई
व्यथा नहीं दिखती ।
करूणता ही है ना ? ●

**जैन जागृति - एप्रिल २०१७**
**''भगवान महावीर**
**जन्मकल्याणक अंक''**
**आजच या अंकास जाहिरात द्या.**

## कव्हर तपशील - मार्च २०१७

❖ **श्री जीरावला तीर्थ – प्रतिष्ठा महोत्सव**

महान ऐतिहासिक जीरावला तीर्थचा प्रतिष्ठा महोत्सव ३० जानेवारी ते २ फेब्रुवारी या काळात अतिभव्य कार्यक्रमात संपन्न झाला. या महोत्सवात अनेक गच्छाधिपती, आचार्य भगवंत, साधू साध्वी व लाखो समाज बांधवांनी भाग घेतला. प्रतिष्ठा महोत्सवात मंदीर व परिसरात अत्यंत आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

❖ **एज द इमेज ब्राइटन्स, पुस्तक प्रकाशन, चेन्नई**

एज द इमेज ब्राइटन्स, अष्टमंगल ध्यान साधनाची इंग्रजी मधील पुस्तकाचे विमोचन चेन्नई येथे ९ जानेवारी रोजी भव्य कार्यक्रमात संपन्न झाले. या पुस्तकात उपाध्याय श्री. प्रवीणऋषिजी म.सा. यांची प्रभावशाली ध्यान साधनामध्ये अष्टमंगलाचे प्रतिक चिन्हांचा समाविष्ट केला आहे. या पुस्तकाचे प्रकाशन आनंद तीर्थ केंद्रिय परिषद यांनी केले.

❖ **युग पुरुष 'महात्मा के महात्मा' – नाटक**

युगपुरुष 'महात्मा के महात्मा' या हिन्दी व गुजराथी नाटकाचा प्रयोग पुण्यात आयोजित करण्यात आला. अध्यात्मिक गुरु राजचंद्र यांच्या १५० व्या जयंती निमित्त श्रीमद राजचंद्र मिशन, धरमपूर यांच्या वतीने हे प्रयोग देश-विदेशात सादर केले जात आहेत.

श्रीमद् राजचंद्रजी यांचा महात्मा गांधीजींच्या जीवनावर सखोल प्रभाव होता. त्याची माहिती या नाटकाद्वारे होते.

❖ **श्री. विशाल चोरडिया, पुणे – अध्यक्षपदी**

पुणे येथील उद्योगपती युवा कार्यकर्ते श्री. विशालजी राजकुमारजी चोरडिया (प्रवीण मसालेवाले) यांची राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे. महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन श्री. चोरडिया यांनी मंडळाच्या कामकाजाचा पदभार स्विकारला.

❖ **आनंद तीर्थ, चिचोंडी – भूमिपूजन**

राष्ट्रसंत आचार्य श्री. आनंदऋषिजी म.सा. यांचे जन्मगाव असलेल्या चिचोंडी, शिराळ येथे उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी म.सा. यांच्या प्रेरणेतून साकारणाऱ्या आनंद फाऊंडेशनच्या आनंद तीर्थ प्रकल्पाच्या पहिल्या टप्याचे भूमिपूजन ९ फेब्रुवारी २०१७ रोजी श्री. अशोकजी पितळे व श्री. राजेंद्रजी लुंकड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री. सतीशजी सुराणा, श्री. सुभाषजी मुथा, श्री. सुरेंद्रजी संचेती, श्री. रविंद्र नहार, श्री. सुनील नहार, श्री. मदनलालजी देसर्डा, श्री. रमेश गुगळे, श्री. बाबुशेठ बोरा, श्री. पारस गांधी इ. मान्यवर उपस्थित होते.

❖ **सुर्यदत्ता नॅशनल अॅवार्ड – २०१७**

सुर्यदत्ता ग्रुपच्या १९ व्या वर्धापन दिना निमित्त भारत व परदेशातील नामवंत व्यक्तिंना त्यांच्या क्षेत्रात दिलेल्या योगदाना बद्दल सुर्यदत्ता नॅशनल अॅवार्ड ८ फेब्रुवारी रोजी भव्य कार्यक्रमात देण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून छत्तीसगडचे माजी राज्यपाल श्री. शेखर दत्त, एम.एस. बिट्टा, ऑल इंडिया अँटी टेररिस्ट अध्यक्ष, युवाचार्य श्री शुभमजी इ. मान्यवर उपस्थित होते.

❖ **एच.एन.डी. पुणे – छात्र पुरस्कार**

पुणे येथील एच.एन.डी. जैन बोर्डींग येथे स्व. नलीनचंद्रजी गांधी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ सर्वोत्कृष्ट छात्र पुरस्काराचे वितरण अॅड. हितेशजी जैन, अॅड. एस. के. जैन, श्री. चकोरजी गांधी, श्री. सुरेंद्रजी गांधी यांच्या हस्ते श्री रयन पांडे याला देण्यात आला.

❖ **श्री मानव मिलन महिला विभाग, पुणे**

नेपाळ केसरी श्री मणिभद्रजी म.सा. यांच्या प्रेरणेने १८ वर्षापूर्वी पुणे येथे मानव मिलन महिला

विभागाची स्थापना झाली. वार्षिक अधिवेशनात या वर्षासाठी सौ. ललीता कांकरिया यांची अध्यक्षपदी व सौ. निर्मला खिंवसरा यांची उपाध्यक्षपदी निवड एकमताने करण्यात आली.

❖ **राज मसाले, पुणे – वर्धापन दिन**

राज मसाले पुणे यांनी आयोजित केलेल्या विशेष स्किमचा बक्षीस समारंभ २६ जानेवारी रोजी पुणे येथे संपन्न झाला. विक्रीकर सहआयुक्त श्री. प्रशांत नांदेडकर व सहआयुक्त अन्न परिमंडळाचे श्री. संजय शिंदे हे प्रमुख पाहुणे होते. व श्री. महेंद्रकुमार खाबिया व श्री. प्रितम खाबिया यांच्या उपस्थितीत बक्षिस वितरण करण्यात आले.

❖ **डेक्कन होंडा, पुणे**

पुणे येथील डेक्कन होंडा येथे नवीन होंडा सिटी २०१७ गाडी चे अनावर १४ फेब्रुवारी रोजी श्री. सरत चक्रवर्ती, श्री. सचिन बत्रा यांच्या हस्ते व डेक्कन होंडाचे डायरेक्टर श्री. अभय बाफना, श्री. अजय बाफना, श्री. श्रेयस बाफना यांच्या उपस्थित करण्यात आले.

❖ **पुणे मनपा निवडणूक**

पुणे महानगर पालिकेची निवडणूक २१ फेब्रुवारी २०१७ रोजी संपन्न झाली. या निवडणूकीत जैन समाजाचे श्री. प्रवीणजी चोरबेले – भाजपा, व श्री. बाळासाहेब ओसवाल – शिवसेना हे विजयी झाले आहेत. ●


**महाराष्ट्र शासन**

**उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे – ४११ ००१.**

**राज्य शासनाची इयत्ता १२ वी नंतरच्या सर्व अभ्यासक्रमांमध्ये (कला, वाणिज्य, विज्ञान पदवी व पदव्युत्तर) शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती सन २०१६–१७**

महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विभागाकडून, इयत्ता १२ वी नंतरच्या सर्व पारंपारिक अभ्यासक्रमांमध्ये (उदा. कला, वाणिज्य आणि विज्ञान पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम) शिक्षण घेत असलेल्या मुस्लिम, शिख, बौध्द, ख्रिश्चन, पारसी, जैन व ज्यू या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती सुरु करण्यात आलेली आहे.

या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी सन २०१६–१७ साठी विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Renewal) करण्यासाठी ऑफलाईन (Offline) पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. पात्र विद्यार्थ्यांनी www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर जाऊन अर्ज डाऊनलोड करावा व अर्ज परिपूर्ण भरुन आवश्यक त्या सहपत्रांसह महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे विहित मुदतीत सादर करावा. संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी अर्जाची छाननी करुन पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज आवश्यक त्या सहपत्रांसह व विद्यार्थ्यांच्या सद्यस्थितीत सुरु असलेल्या बँक पासबुकच्या पहिल्या पानाच्या झेरॉक्स प्रतिसह (ज्यावर बँक खाते क्रमांक व आयएफएससी कोड नमूद केलेला असावा) तसेच आधार कार्डच्या झेरॉक्स प्रतिसह संबंधित विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांचेकडे विहित मुदतीत सादर करावेत. विद्यार्थ्यांच्या बँक खात्याचा तपशील अचूक असणे आवश्यक आहे. बँक खात्याचा तपशिल चुकीचा असल्यास अथवा बँक खाते बंद असल्यास शिष्यवृत्तीची रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा होऊ शकणार नाही. विद्यार्थ्यांचे आधार कार्ड त्यांच्या अर्जात नमूद बँक खात्याशी संलग्न केलेले असावे. – वेळापत्रक

| क्र. | कार्यसूची | कालावधी |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांनी www.dhepune.gov.in या संकेत स्थळावरुन अर्जाचा नमूना डाऊनलोड (Download) करुन परिपूर्णरीत्या भरुन आवश्यक त्या सहपत्रांसह प्राचार्यांकडे सादर करणे. | दि. २०–२–२०१७ ते दि. २०–३–२०१७ पर्यंत |
| २. | विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अर्जाची महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी तपासणी करुन अर्जाच्या मूळ प्रति सहपत्रांसह संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे जमा करण्याचा कालावधी | दि. १०–३–२०१७ ते दि. २०–३–२०१७ पर्यंत |
| ३. | संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाने विद्यार्थ्यांच्या अर्जाची छाननी करुन पात्र विद्यार्थ्यांची विहित नमुन्यातील यादी उच्च शिक्षण संचालनालयास जमा करण्याचा कालावधी | दि. २०–३–२०१७ ते दि. २५–३–२०१७ पर्यंत |

या योजनेचा सविस्तर जाहिरात, अर्जाचा नमुना, विद्यार्थ्यांना www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण किंवा उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे यांचा दुरध्वनी क्रमांक ०२०–२६१२६९३९ वर संपर्क साधावा.

**(डॉ. धनराज माने)**, शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे – १.